मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/१०४
दिनांक : ०१.०७.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**राज्यात राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार- मा.ना.श्री. मंगलप्रभात लोढा, मंत्री, महिला व बालविकास.**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनानिमित्त राज्यात ३,५०,००० युवतींना हिंसाचारविरूध्द मनोबल उंचावण्यासाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याची घोषणा मा.ना.श्री.मंगलप्रभात लोढा, मंत्री, महिला व बालविकास यांनी केली.

राज्यात महिला व मुलींच्या होणाऱ्या निघृण हत्या व हिंसाचार ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वात जास्त शहरीकरणे झालेले राज्य आहे. बदलत्या काळानुसार महिलांच्या बदलेल्या समस्या व त्यावर कराव्या लागणाऱ्या उपाययोजना ही शासनाच्या नियोजनाची अत्यावश्यक बाब झालेली आहे. अलीकडील काळात महिला व मुलींवर होणारे क्रुर हिंसाचार व त्यातुन केली जाणारी त्यांची हत्या हे शासनासमोरील व समाजासमोरील आव्हान ठरत आहे. यास आळा बसण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे खुपच आवश्यक आहे. शाळकरी व महाविद्यालयीन तरूण-तरूणी यांची जिवनशैली तंत्रज्ञानाने खुपच बदलली आहे व त्यातुन निर्माण होणाऱ्या समस्या पुर्ण तरूण पिढीला वाम मार्गावर नेत आहे.

सदर, राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण मोहिमेच्या शुभारंभ कार्यक्रमासाठी दिनांक ०३ जुलै, २०२३ रोजी ठिक १२.०० वाजता मंत्रालय गार्डन गेट, आकाशवाणी आमदारनिवास समोर, मुंबई येथे होणार असून सदर कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या १०० युवती व कार्यक्रम अधिकारी उपस्थित राहणे अपेक्षित आहे. यासाठी गुगल फॉर्म तयार करून ग्रुपमध्ये पाठविण्यात येत आहे. प्रथम नोंद होणाऱ्या १०० युवतींना कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी देण्यात येईल.

योग्य तो प्रतिसादाच्या अपेक्षित.

आपला,

श्री. सुशील शिंदे
विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)

-Sd/-
श्री. सुधीर पुराणिक
संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ